ISSN 2394-5303

# Printing Area™

Issue-41, Vol-05, May-2018

International Multilingual Research Journal

UGC Approved Refereed Journal
Jr.No.43053

Editor
Dr.Bapu G.Gholap

Scanned by CamScanner

UGC Approved
Jr.No.43053

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

## Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

May 2018, Issue-41, Vol-05

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**Co-Editor**
**Dr. Ravindranath Kewat**
(M.A. Ph.D.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned by CamScanner

14) DEVELOPINING E-LEARNING COMPETENCIES AMONG TEACHERS
Swangi || 55

15) e-Governance initiative of Maharashtra : A Study
Dr. Atul D. Wankhade || 59

16) आद्यक्रांतीकारक उमाजी नाईक
प्रा. डॉ. वसंत श्रावण देसले || 62

17) शिक्षक शिक्षणाच्या कार्यक्रमात अध्ययन व अध्यापन कौशल्याची गरज
डॉ. मच्छिंद्र रामचंद्र गोटे || 64

18) "समकालीन राजकीय सत्ता संघर्षाचे चित्रण करणारी कादंबरी : नामदार श्रीमती"
प्रा.डॉ.यशवंत आश्रुबा हाके || 69

19) अंबाजोगाई येथील अमृतेश्वर (अमलेश्वर) मंदिर-एक दृष्टिक्षेप
प्रा. डॉ. कदम एस.आर. || 73

20) संगीत, संपादन प्रेरणा आणि लिंग घटकाचा सृजनशीलतेवर होणारा परिणाम
डॉ. गजानन रमेशराव रत्नपारखी || 76

21) संत जनाबाईच्या अभंगातील लोकजीवन
प्रा.केशव धोंडिबा टिपरसे || 82

22) भारतीय जातिव्यवस्था आणि कोल्हाटी जमात
सौ. काळे सुप्रिया हेमंतकुमार || 84

23) ग्रामिण भागातील कला महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा देणाऱ्या ......
प्रा. मोहन शशीकांत रतकंठीवार || 89

24) भारतातील चलनवाढीची प्रवृत्ती
प्रा. डॉ. मधुकर एस. ताकतोडे || 93

25) ई लर्निंग एक उपयुक्त साधन
कु. जया डब्लु. वागदे, || 97

26) आधुनिक महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाचा विकास
प्रा.एकनाथ दत्तात्रय वाजगे || 99

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com



Scanned by CamScanner

लोक प्रसन्न, आनंदी राहण्यासाठी तसेच देवाना प्रसन्न करून घेण्यासाठी वाद्याचा, संगीताचा आधार घेत होती, 'झडती नामाचा चौघडा | ब्रम्ही ब्राहरुपींचा हुडा || आऊबाई तु तारी | मंजुळ उमटती स्वरी || यावरुन असे स्पष्ट होत की, तत्कालीन लोकजीवनात व्रत वैकल्याबरोबरच नवस सायास यालाही फार महत्त्व होते- हे संत जनाबाईच्या अभंगातून स्पष्ट होताना दिसते. प्रत्यक्ष जनाबाईची जन्मच माता-पित्याने नेवस केला आणि तो पूर्ण करण्यासाठी जनाबाईला दामाशेटकडे सोडले. तसेच संत नामदेवाचा जन्म हे त्याच्या आई वडिलानी नवस केल्यानंतरच झाला याविषयी जनाबाई आपले विचार व्यक्त करताना म्हणते, "गोणाई नवस केला | देवा पुत्र देई मला || खंडेराया तुझे तुज करिते. नवसु | मरु दे रे सासू खंडेराया || गोणाईने नवस केला आणि नामदेवासारखा पुत्र झाला तर तत्कालीन स्त्री-स्त्री नात्यातील संबधा विषयी एक स्त्री खंडेरायाला नवस करते माझ्या घरातील सासू आणि नणंद मरु दे म्हणजे मी सुखाने संसार करिन अशा प्रकारचे लोकजीवन संत जनाबाईच्या अभंगातून व्यक्त स्पष्ट होताना दिसते.

**सारांश**

संत जनाबाईचे मन अतिशय सजग आणि संवेदनाप्रधान असे आहे. त्यांची प्रज्ञा अतिशय प्रखर अशी आहे. म्हणूनच समकालीन वास्तवाचे आकलन त्यानी अचूकपणे साधले आहे. नामदेवाचे दासीतत्व पत्करलेली जनाबाई अतिशय प्रखडपणे लोकजीवनातील वाईट प्रथा, गोष्टी विषयी आपले मत मांडते आणि विठ्ठल आणि आपले नाते समाजाची सर्व बंधने झुगारुन ठसठशीत शब्दात व्यक्त करणारी जनाबाई बंडखोर स्त्री ठरते. तिने रेखाटलेली क्षणचित्रे, प्रसंगचित्रे, व्यक्तिचित्रे म्हणून उत्कट आहेत. भावगर्भता, कथनात्मकता, नाटयात्मकता आणि अल्पाक्षरत्त्व हे तिच्या अभंगवाणीचे विशेष जाणवतात. जनसामान्यांशी नाते जोडून, त्याच्या दु:खाकडे सहानुभूतीने पाहणाऱ्या जनाबाई जनभाषेचा आधार घेऊन त्यांना उपदेश करतात. संत जनाबाईचे लोकजीवनाविषयीचे आकलन थक्क करुन टाकणारे आहे.

**संदर्भ**


१) इर्लेकर सुहासिनी, जनाबाईचे निवडक अभंग, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे. (२००८)

२) गवळी अनिल, (संपादक) जनाबाईचे अभंग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (२०१४)

३) मिरजकर श्यामसुंदर, संत नामदेव डोळस श्रध्देची मांडणी, नाग-नालंदा प्रकाशन, इस्लापूर, (२०१६)

४) गवस राजन, रोकडे पाझर, दर्या प्रकाशन, पुणे


**22**

# भारतीय जातिव्यवस्था आणि कोल्हाटी जमात


**सौ. काळे सुप्रिया हेमंतकुमार**
पीएच. डी. संशोधक विद्यार्थीनी
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.


**********

**प्रस्तावना—**

भारतीय स्वातंत्र्य व लोकशाही गणराज्य प्रणालीमुळे देशामध्ये राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक घडामोडी व बदल जाणवतात. स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणामुळे मागास व असंवेदनशील पिढितून सश्जनशील, जागृत पिढी निर्माण होण्यास मदत मिळाली. भारतीय संस्कृतीचे एक वैशिष्टय म्हणजे जातीव्यवस्था किंवा त्यास जातीसंस्था असेही म्हणतात की जी आजतागायत अस्तित्वात आहे. या जातिसंस्थेचा जेवढा समाजशास्त्रीय विचार झालेला आहे तेवढा तिचा अर्थशास्त्रीय विचार झालेला नाही. प्राचीन काळी हिंदू धर्मियांनी जी जाचक बंधने निम्न जातींवर लादली त्याचे चटके आजही या जाती—जमातींना बसताना दिसतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांनी त्यास प्रखर विरोध केला. तसेच अनेक समाजसुधारकांनी आपल्या वाणी, लेखनातून तो विरोध व्यक्त केला. त्याचा आदर्श नवी पीढी घेवू लागली आहे.

भारतीय जातीव्यवस्था ही गुंतागुंतीची व बंदिस्त असल्याचे दिसते. यामध्ये उच्च—निच्च, वर्ग—वर्ण, जाती—उपजाती यांचा समावेश होतो. या जातीव्यवस्थे मध्ये पूर्वीपासून कलावंत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोल्हाटी जमातीचे स्थान प्रस्तुत शोध निबंधात स्पष्ट केला. आहे. कोल्हाटी जमातीचे जातीव्यवस्थेतील स्थान पाहण्यापूर्वी जातीव्यवस्थेचा उगम, जात म्हणजे नेमके काय? हे पाहणे अनिवार्य आहे. अनेक संदर्भ ग्रंथांचा



Scanned by CamScanner

आधार घेवून कोल्हाटी जमातीचा पारंपारिक व्यवसाय,त्यानुसार त्यांचे वर्णव्यवस्थेतील स्थान स्पष्ट होते. शुद्र वर्ण त्यापैकी प्रामुख्याने शुद्र स्त्रीची होणारी अवहेलना मन हेलवून टाकणारी आहे. धर्म ग्रंथांमध्ये दिलेले नियम अतिशय जाचक व शुद्रांच्या विरोधी व उच्च वर्णियांच्या नेमके सोयीचे वाटतात. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये जातीव्यवस्थेचे समाजातील महत्व व त्यामुळे जात आणि पारंपारिक व्यवसाय हा संबंध स्पष्ट होतो.

**उद्‌दिष्टये —**

१. भारतातील जातीव्यवस्थेचा स्तर उगम व पध्दती स्पष्ट करणे.

२. जती व्यवस्थेची ओळख करुन देणे.

३. जातीव्यवस्थेतील कोल्हाटी जमातीचे स्थान स्पष्ट करणे.

४. जातीसंस्थेमुळे कोल्हाटी जमात व पारंपारिक व्यवसाय या समीकरणाची उकल करणे.

**गृहितके—**

१. भारतातील जातीव्यवस्था प्राचीन काळापासून ताठर आहे.

२. जात ही हिंदू समाजातील प्रभावी घटक आहे.

३. जातीव्यवस्थेला अर्थकारण जबाबदार आहे.

४. शुद्रांची अवहेलना धर्मग्रंथापासूनच आहे.

**समाज—**

समूहात राहणाऱ्या व्यक्तींमध्ये असणारी संबंधांची व्यवस्था म्हणजे समाज. मानव हा समाजप्रिय प्राणी आहे या वाक्यानुसार दैनंदिन जीवन जगत असताना तो आधार म्हणून समाजाशी किंवा जनसमुदायाशी एकरुप होऊन वागत असतो. परंतु जात, धर्म, लिंग,वंश,वर्ग या संकल्पनांमुळे तो संकुचित व मर्यादित जीवन जगण्याचा प्रयत्न करतो. उदा. भारतीय समाज, आर्य समाज, हिंदू समाज इ.

Oxford Dictionary ने केलेली समाजाची व्याख्या

ही एक भाववाचक संज्ञा, लोकांचे विविध गुंतागुंतीचे विश्वास, वर्तन, नियम यांना अनुसरुन त्यावर ठाम अथवा चिटकून राहणे असे सांगतो. समाज हा नेहमी एकटया दुकटया व्यक्तिपेक्षा नेहमीच मोठा असतो आणि त्याची व्याख्या नकारात्मकपणे व्यक्ति किंवा व्यक्तिच्या विरुध्द अर्थी अशी केली जाते. व्यक्तिच्या इच्छेप्रमाणे/मनाप्रमाणे वागण्यावर बंधने आणणारा घटक परंतु अधिक सकारात्मकपणे देखील व्यक्त करता येतो. जसे एखादया व्यक्तिच्या विकासासाठी/उन्नतीसाठी विविध संस्था, संघटना आणि नाते संबंधातून पूरक ठरणारा घटक होय. संस्कृती या संज्ञेबरोबर नेहमी विरोधात्मक म्हणून समाज तपासून पाहिला जातो. समाज हा संस्कशतीच्या गाभ्यातून घडला आहे. समाज अधिक संघटित आहे आणि होतो आहे. परंतु संस्कृतीचे तसे नाही. दुसऱ्या शब्दात समाज हा अधिकारवाणीने व्यक्त होतो तर संस्कृती प्रश्नार्थक पध्दतीने व्यक्त होतो.

Oxford Dictionary च्या या व्याख्येवरुन समाज ही संकल्पना स्पष्ट होण्यास मदत होते. तसेच समाज हा व्यक्तिला मनाप्रमाणे वागण्यावर बंधन आणणारा घटक असला तरी त्याचा अर्थ सकारात्मक दृष्टीकोनातूनही या व्याख्येत दिल्याचे दिसते.

**वर्णव्यवस्थेतील कोल्हाटी जमातीचे स्थान—**

चातुवर्ण्य हे आर्यांच्या समाजव्यवस्थेतील सर्वांत मोलाचे वैशिष्टय होते/आहे. आर्य समाजात मुख्य तीन वर्ण ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य हयानांच त्रैवर्णिक म्हणतात. चौथा वर्ण शुद्रांचा तो मिळून चातुर्वर्ण्य होय. हे चातुवर्ण्य विविध ग्रंथामध्ये वर्णिले आहेत. यामध्ये कोल्हाटी जमातीचे स्थान पुढीलप्रमाणे स्पष्ट होते.

**अलबेरुनी(प्र.आ.१९८६, पुर्नमुद्रण २००९)—**

यांच्यामते, इतिहासाकडे दृष्टीक्षेप टाकल्यास प्राचीन काळातीला कर्तव्यदक्ष राज्यकर्त्यांनी ाआपल्या राज्यातील विविध सामाजिक घटक एकमेकांत मिसळून त्यांच्यामध्ये संकर होऊ नये व आपल्या बचावाची घडी नीट बसावी यासाठी अत्यंत दक्षतेने पाऊल टाकल्याचे दिसते व त्यांनी समाजाचे विविध वर्ण पाडले व त्या वर्णाने नेमून दिलेले कार्य करावे असा दंडकही घातला. एका वर्गातील लोकांनी दुसऱ्या वर्गातील लोकांशी बेटी व्यवहार करु नयेत अशा प्रकारचे कडक नियमही घालून दिले. नियमांचे काटेकोर पालन व्हावे याकडे विशेष लक्ष देऊन नियमाचा भंग केल्यास कडक शासन केले जाई. खुसरुंनी प्रस्थापित केलेल्या समाजव्यवस्थेचे कित्येक दाखले प्राचीन



Scanned by CamScanner

इतिहासात आढळतात.

अलबेरुनी यांनी आपल्या ग्रंथात अर्दशीर बिन बाबक या राजाने समाज घटकांची विभागणी पुढील चार वर्गात केलेली दिसते.

पहिला वर्ग— राजे आणि सरदार

दुसरा वर्ग— कायदेपंडित, साधू आणि अग्निपूजक

तिसरा वर्ग— वैदय, खगोलशास्त्रज्ञ व वैज्ञानिक

चौथा वर्ग— कशषिवल, कलावंत

वरील ऐतिहासिक पुराव्यामुळे कलावंतांचे स्थान चौथ्या वर्गात होते हे लक्षात येते.

**'जात' शब्दाची व्याख्या—**

J.H.Hutton (१९६३)

जत ही मुळातच अत्यंत गुंतागुंतीची संस्था असून ती इतकी गुंतागुंतीची संस्था आहे की तीचे स्वरुप एका विशिष्ट क्षेत्रापुरते मर्यादित असते आणि ती फक्त भारतातच आहे. याबाबत शंका नाही.

भारतीय संस्कृतीशोष खंड—४ मध्ये दिल्याप्रमाणे नर्बदेश्वर यांनी जातीची व्याख्या पुढीलप्रमाणे मांडली आहे. "जाती या व्यावसायिक समूह होत्या म्हणून जेवढा व्यवसाय कनिष्ठ स्वरुपाचा असेल तेवढा त्या जातीचा दर्जा कनिष्ठ होता".

यावरुन जात ही व्यावसायाआधारित असून ही एक गुंतागुंतीची संस्था असल्याचे स्पष्ट होते.

४. इरावती कर्वे (प्र.आ.१९७५)—

जाती हे आतल्या आत विवाह म्हणजे अंतर्विवाह करणारे समूह आहेत.

५. मा.म.देशमुख (प्र.आ.१९६७,तृ.आ.१९९८)—

"एका मूळ पुरुषापासून निर्माण झालेल्या समान आहार, विवाह, व्यवसाय वगैरे सामाजिक, धार्मिक व आर्थिक रुढींनी बध्द असलेल्या अनेक कुटुंबांच्या संघटनेला जात असे म्हणता येईल".

वरील व्याख्यांनुसार जात ही जन्म, वंश, व्यवसाय या बाबींमध्ये बांधलेली आहे व ती केवळ भारतातच असून ताठर असल्याचे दिसते.

**जाती व्यवस्थेचा उगम—**

भारतात ज्या आर्याच्यापासून जातिभेदांचा थांगपत्ता लागत जातो ते आर्य इतिहास संशोधकांच्या मते इ.स.वी. सनाच्या पूर्वी सुमारे २००० ते २५०० वर्षाच्या काळांत वायव्येकडील खैबर खिंडीतून भारतात ओ. इराणच्या आखातातून पूर्वेकडे सरकत येत असताना त्यांची ग्रंथ रचनाही चालू असावी. या त्यांच्या ग्रंथात सर्वात जुना ऋग्वेद आपणाला सापडतो. ऋग्वेद आर्यांनी इराणच्या आखाताजवळ असतानाच रचायला सुरुवात केली असे विद्वानांचे मत आहे. या ऋग्वेदांतील दहाव्या मंडळांत एक ऋचा आहे. तीत म्हटले आहे.

ब्राम्हणोस्य मखमासीष्दाहू राजन्य कृत:।

उरु तदस्य यद् वैश्य: पदभ्यांशूद्री अजायत:।।

याचा अर्थ असा की, त्या विराट पुरुषाच्या मुखापासून ब्राम्हण बाहूपासून क्षत्रिय, मांडीपासून वैश्य आणि पायापासून शुद्र निर्माण झाले.

अशाप्रकारे नामदेव व्हटकर वर्णव्यवस्थेतील चार वर्णाचा उमग स्पष्ट करतात. त्यावरुन शुद्र वर्णाचे स्थान निम्न दर्जाचे होते असे दिसते.

शकुंतला देवी(१९९९)च्या मते सामान्यपणे जातीची वेगवेगळया उपविभागामध्ये विभागणी करण्यात आली आहे. एका पोटजातीच्या सभासदाने त्याच पोटजातीच्या सभासदाशी लग्न करावे, जातीपेक्षा पोटजातीला कमी महत्व आहे. त्यांच्यामते, उच्च जातींना oxGsdj.;k vkysvkgs R;ak Hypergamy असे म्हणतात. उदा. मनुमध्ये कॅडल (IV61), विष्णू (Dhs-36), यज (I273), ब्रहदयामा (III260), मनु (२७९) मध्ये शब्दाचा वापर केला आहे. स्मृतीमध्ये अत्यंजाचे वेगवेगळे उपविभाग दिसून येतात. अत्री १९९ मध्ये सात अंत्यजाचे विश्लेषण केले आहे. त्यामध्ये रजका (परीट), चर्मकार (कातडीचे कामगार),नट (नर्तक—नर्तिका), कोल्हाटींचे प्रतिनिधित्व करते. बुरुडा (बांबूचे काम करणारे), कैवरता (मासे पकडणारे), मेदा, भिल्ल इ. वेद व्यास स्मृतीने १२—१३ मध्ये १२ जातींचे विश्लेषण केले आहे. ते अंत्यजा नावाने ओळखले जाते.

शकुंतला देवी (१९९९) यांनी नमूद केल्याप्रमाणे अत्यंजा (शुद्र) मध्ये नर्तक—नर्तिका हे कोल्हाटी जमातीचे प्रतिनिधित्व करतात.

**जातीव्यवस्थेतला अर्थकारण जबाबदार कसे?**

साधारणत: पाटील, कुलकर्णी सोडून चौगुला, महार, सुतार, लोहार, चांभार, कुंभार,न्हावी, सोनार,



Scanned by CamScanner

जोशी, परीट, गुरव, कोळी यांना बारा कारु किंवा बलुतदार म्हणतात. तेली, तांबोळी, साळी, सनगर, शिंपी, माळी, गोंधळी, डौव्या, भाट, ठाकर, गोसावी, जंगम, मुलानी, वाजंत्री, घडसी, कलावंत, तराल किंवा कोरबू,भोई वगैरा आठरा नारु किंवा आलुतदार असे म्हणतात.

**त्रिं.ना.अत्रे (प्र.आ.१९१५,पुर्नमुद्रण १९९५)—**

यांनी गावगाडा या ग्रंथात कारु व नारु किंवा बलुतदार व आलुतदार अशी विविध जातींची विभागणी त्याकाळी असल्याचे सांगितले. त्याचबरोबर बी.एन. सरदेसाई २००१ यांनी जातीव्यवस्थेच्या मुलाशी आर्थिक कारणे जबाबदार असल्याचे त्यांच्या ग्रंथात स्पष्ट केले आहे. त्यांच्यामते, आर्थिक कारणे प्रामुख्याने बलुतेदार पध्दतीशी निगडित आहेत. प्रत्येक बलुता हे वतन असे. यावरुन जातिव्यवस्थेच्या उगमाला अर्थकारण जबाबदार असल्याचे दिसते.

**जातिसंस्थेचे अर्थशास्त्रीय समर्थन—**

जातीसंस्था ही समाजशास्त्रीयदृष्टया समर्थनीय नाही तर तिचे अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनेही फायदे होते. एक तर जाती व्यवस्थेत प्रत्येक जातीचे व्यवसाय ठरवून दिलेले असल्याने कोणत्याही व्यक्तिची जीवनवृत्ती ठरविण्याची जबाबदारी व्यक्तिवर येत नाही. तसेच एकच व्यवसाय वंशपरंपरेने करीत राहिल्याने तो व्यवसाय करण्याचे पिंडाचे कौशल्य विकसित होत राहते. त्यामुळे कौशल्य मिळविण्यासाठी धावपळ, खर्च करण्याची गरज नाही. फक्त एकच जात विशिष्ट व्यवसाय करीत असल्याने स्पर्धा मर्यादित राहत होती. (म्हणजेच तीव्र स्पर्धेच्या दोषापासून उदरनिर्वाह सुरक्षित राहता होता) उत्पादकाला बाजारपेठा मिळविण्यासाठी धावपळ, खर्च वैगेरे करण्याची गरज नाही. फक्त एकच जात विशिष्ट व्यवसाय करीत असल्याने स्पर्धा मर्यादित राहत होती म्हणजेच तीव्र. नानायुक्त्या करीत बसावे लागत नव्हते. अन्य जाती हे त्यांच्या उत्पादनाचे गिऱ्हाईक. गिऱ्हाईक म्हणजे निश्चित असल्याने सुरक्षितता किंवा तोटा भिती नव्हती. गावाला ज्या ज्या धंदयाची जरुर पडेल ते करणाऱ्या जातींनी गावात रहावे आणि गावाने त्यांना पोसावे असा सरळ, सोपा व्यवहार हिंदूच्या अर्थशास्त्रात आहे. समाज आपले पोषण करतो त्या बदल्यात जात समाजात वस्तू व सेवा पुरविते. म्हणून उत्पादन हे नफा नव्हे तर भावनेतून व गरजेतून होत होते. परस्पर पोषण हा अर्थव्यवहाराचा पाया मानला होता. सर्व जातींना त्यांच्या गुणाप्रमाणे व्यवसाय दिले होते. त्यामुळे व्यक्ति आपल्या व्यवसाय बदलून वर्णांतर करण्याऱ्यांचा वंश खंडित होतो असे मानले जात होते.

वरिल संदर्भावरुन शुद्र या चौथ्या वर्णात गावगाडयात कलावंत म्हणून ओळखली जाणारी कोल्हाटी जमात पारंपारिक व्यवसाय व प्राचीन अर्थकारणात गुंतलेली दिसते. तसेच हे चक्र कोल्हाटी जमातीच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृति विकासाच्या अडथळयास संबंधित असल्याचे दिसते.

**शुद्रांची अवहेलना धर्मग्रंथापासूनच—**

टनेक समाजसुधारकांनी धर्मग्रंथ, वेद, पुराणे ही केवळ शुद्र वर्णियांना गाळात रुतविण्यासाठीच होती असे मानून त्याबद्दल प्रखर विरोध केलेला दिसतो. त्याचे अनेक दाखले समाजसुधारकांच्या लेखनातून व्यक्त होतात.

धनंजय कीर (प्र.आर.१९८९,पुर्नमुद्रण १९३८) यांनी महात्मा जोतीराव फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक या चरित्र ग्रंथात ते म्हणतात, वेद हे ईश्वरनिर्मित नसून ते मानवनिर्मित आहेत. वेद म्हणजे भेद

कीर यांनी जोतिरावांच्या या मतावरुन त्यांना वेद, धर्मग्रंथ याबद्दल असणारी चीड व्यक्त केली आहे. गंगाधर पानतावणे (प्र.आ.१९८७) हे त्यांच्या पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर या ग्रंथात म्हणतात की, त्रैवर्णिकांची सेवा करण्यानेच शुद्रांना व अतिशूद्रांना मरणोत्तर सद्गती मिळेल असे धूर्त शास्त्रकारांनी लिहून ठेवले आहे. याचा अर्थ असा की, तुम्ही जिवंत असता आमच्या गुलामगिरीत रहा. नरकवास भोगा म्हणजे मेल्यावर तुम्हाला स्वर्ग प्राप्त होईल.

यावरुन धर्मग्रंथांनी शुद्रांना केवळ तीन वर्णियांची सेवा व चाकरी करण्याचे आदेश दिले होते आणि ध र्मग्रंथांच्या मान्यतेला फुले, आंबेडकर या विचारवंतांचा विरोध होता.

आ.ह.साळुंखे( १९९८) यांनी एका माणसाा दुसऱ्या माणसाच्या तिरस्काराचा बळी बनविणाऱ्या या प्रथेचे धर्मसूत्रांमध्ये आढळणारे काही आधार आपल्या 'वैदिक धर्मसूत्रे आणि बहुजनांची गुलामगिरी' या ग्रंथात तपासून पाहिले आहेत.



Scanned by CamScanner

अपस्तंभ म्हणतो, शुद्राने धार्मिक आर्याची निंदा केली तर त्या शुद्राची जीभ छाटावी.

बौधयानाने धर्मग्रंथात म्हटले आहे, ब्राम्हण चारही वर्णातील स्त्रियांना भार्या करु शकतो.

वसिष्ठांच्या मते, कृष्ण वर्णाची जी रमणी असते ती फक्त भोगण्यासाठीच असते. धर्मासाठी नसते.

यावरुन बौध्दयानाने ब्राम्हणाला चारही वर्णातील स्त्रिया भार्या (पत्नी) करता येतील म्हणजेच शुद्र स्त्री व शुद्र व्यक्ति केवळ यांच्यासाठी अनेक जाचक नियमांची निर्मिती केलेली दिसून येते. म्हणूनच ब्राम्हण वर्गाने वर्षानुवर्ष लेखनी ही स्वत:च्याच हातात ठेवली. शुद्रांचे धर्म व वर्णाच्या आधारे शोषा केले. या ब्राम्हणांनी धर्मग्रंथांची रचना स्वत:च्या सोईसाठी केलेली दिसते. या सर्वांचा संबंध शुद्र वर्णातील कोल्हाटी जमात व कलावंतीण स्त्री च्या जीवनाशी जोडता येईल व कोल्हाटी जमात भटकंती करत असताना प्राचीन काळापासून जातीव्यवस्थेच्या बंधनात अडकल्याचे दिसते.

**निष्कर्ष —**

१. जातीव्यवस्था ही हिंदू संस्कशतीचे एक मूलभूत अंग आहे.

२. जातीव्यवस्था केवळ समाजशास्त्रीय घटक नसून तो अर्थशास्त्रीय घटक आहे.

३. कोल्हाटी जमातीचे स्थान चार्तुवर्णातील चौथ्या वर्गामध्ये आहे.

४. जातीव्यवस्थेला अर्थकारण जबाबदार आहे.

५. सर्व शुद्र वर्गीयांची अवहेलना ही वेद, धर्मग्रंथ यापासून आहे.

**संदर्भ सूची —**

1. IAN BUCHANAN, Oxford Dictionary of Critical Theory, Oxford Publication, New York, 2010, p.no.441

2. अलबेरुनी, 'अलबेरुनीचा भारत' खंड पहिला, साहित्य ॲकॅडमी, नवी दिल्ली, प्र.आ. १९८६,द्वि.आ.२००६,तृ.आ.२००९, पृ.क्र.६८

3. J.H.Hutton, 'Caste In India' (It's nature, function & origins),R.Dayal, Oxford University Press, Bombay, 1963, p.no.46.

4. इरावती कर्वे, 'हिंदू समाज—एक अन्वयार्थ', मौज प्रकाशनगश्ह, मुंबई, प्र.आ.ऑगस्ट १९७५, पृ. क्र.१११

5. मा.म.देशमुख, 'प्राचीन भारताचा इतिहास', विश्वभारती प्रकाशन, नागपूर, प्र.आ.जुलै १९६७,द्वि. आ.जून १९७२, तृ.आ.जानेवारी १९९८, पृ.क्र.८१

6. नामदेव व्हटकर,'भारतातील जातीभेद व त्यावर उपाय', यशश्री प्रकाशन, कोल्हापूर, द्वि.आ. जानेवारी १९६७, पृ.क्र.२१

7. Shakuntala Devi, 'Caste System In India', Pointer publisher, Jaipur(India), 1999, p.no.64.

8. त्रिं.ना.अत्रे, 'गावगाडा', वरदा बुक्स, पुणे, प्र.आ.१९१५, तृ.आ.१ जानेवारी १९८९, पुर्नमुद्रण १जानेवारी १९९५, पृ.क्र.१५

9. बी.एन.सरदेसाई, 'मराठयांचा सामाजिक, आर्थिक व सांस्कशतिक इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ.२००१, पृ.क्र.४२

10. गो.म. जोशी, 'हिंदूंचे अर्थशास्त्र' भाग पहिला, हिंदू संस्कशती, ग्रंथ संपादक व प्रकाशक मंडळ, नागपूर, १९३७, पृ.क्र.२१९.२३०

11. धनंजय कीर, 'महात्मा जोतिराव फुले—आमच्या समाजक्रांतीचे जनक', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र.आ.१८८९ पुर्नमुद्रण १९३८, पृ.क्र.१३५.

12. आमचे टीकाकार:व.भा.२९ जुलै १९२७ cited in गंगाधर पानतावणे, 'पत्रकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर', अभिजित प्रकाशन, नागपूर, प्र.आ.१९८७, पृ.क्र.७५

13. आ.ह.साळुंखे, 'वैदिक धर्मसूत्रे आणि बहुजनांची गुलामगिरी', एक्सप्रेस पब्लिशिंग हाऊस, कोल्हापूर, प्र.आ.ऑगस्ट १९९८, द्वि.आ.डिसेंबर १९९८, पृ.क्र.१०८

14. (तेषां वर्ण—आनुपूर्व्येण चतस्त्रः भार्याः ब्राम्हणस्य। १.१६.२) cited in तत्रैव पृ.क्र.१०९

15. (कृष्ण वर्णा या रामा रमणाय एव न धर्माया १८.१८) cited in तत्रैव पृ.क्र.११०.

❑❑❑



Scanned by CamScanner